## महाराष्ट्र शासन - आरोग्य विभाग


**नोदणीकृत कार्यालयः-**

**राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र, पुणे**

**उरो रुग्णालय इमारत, (पहिला मजला) एस.टी.डी.सी पुणे-४११०२७ महाराष्ट्र**

दूरध्वनी क्रमांक-०२०-२९७०००५३ Email Id- stdcmh2@rntcp.org

**डॉ.अनिरुध्द देशपांडे**
मुख्य वैद्यकिय अधिकारी तथा संचालक


जा.क्र.एसटीडीसी-पुणे/जेवण/250-51/२०२६
दिनांकः १०-०२-२०२६

## नोटीस

विषयः- प्रशिक्षणार्थीना जेवणाचा पुरवठा करणेबाबत....

राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र पुणे या कार्यालयातंर्गत असलेल्या प्रशिक्षणासाठी उपस्थित प्रशिक्षणार्थीच्याकरिता चहा, नाष्टा व जेवण दयावयाचे असून, याबाबतचे आपले सिलंबध दरपत्रक खालील तपशिलाप्रमाणे कार्यालयास पाठवावे, ही विनंती.

दरपत्रकामध्ये नमूद केलेले दर हे सर्व करासह असावेत.

| अ.क्र | बाब | | दर रुपये |
|---|---|---|---|
| १ | चहा | (प्रत्येकी १०० मिली) | |
| २ | **नाष्टा** – कांदापोहे, मेदुवडा, इडली सांभार, बटाटेवडा पाव, उपीट, शिरा, शाबुदाणा वडा, शाबुदाणा खिचडी, सामोसा, ब्रेड आमलेट, अंडा भुरजी, सॅडविच, मिसळ, पाव भाजी, थालपीठ, ब्रेड पॅटीस, कचोरी व केळी | एकवेळेस (पोटभर) | |
| ३ | **जेवण- प्रति ताट**<br>**खाली नमूद केलेल्या पदार्थांचा व मिष्ठान्नांचा समावेश करावा.** | पोटभर | |
| | चांगल्या प्रतीच्या तांदळाचा भात्, पुलाव, फ्राय राईस, मसाले भात, खिचडी | | |
| | साधे फोडणीचे वरण उच्च प्रतीची तुरदाळ, मुगदाळ, मसूरदाळ | | |
| | एक भाजी पाले भाजी/ फळभाजी | | |
| | एक उसळ (मटकी, मुग, वाटाणा, हरभरा, छोले, राजमा, चवळी, मसूर) | | |
| | उत्तम प्रकारच्या गव्हाच्या पोळया /ज्वारीची भाकरी / बाजरीची भाकरी | | |
| | दही वाटी | | |
| | पापड - तळलेला/भाजलेला | | |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| | उकडलेले एक अंडे | | |
| | चटणी/लोणचे/ठेचा | | |
| | कोंशीबीर / सॅलेड (कांदा, काकडी, गाजर, टामॅटो, बीट, मुळा) लिंबू इ.सह | | |
| | स्वीट डिश – श्रीखंड, गुलाबजामुन, बासुंदी, बालूशाही, जिलेबी, बर्फी, गाजर हालवा, आम्रखंड | | |
| 4 | प्रति ताट रात्रीचे<br>भात, वरण, भाजी व चपाती | | |
| | एकूण | | |

उक्त तपशिलामध्ये नमुद केल्याप्रमाणे आपले दरपत्रक सीलबंद लिफाप्यात दिनांक १७/०२/२०२६ पर्यंत (७ दिवसात ) या कार्यालयास स्वहस्ते / पोस्टाने कार्यालयीन वेळेत दुपारी ३ वाजेपर्यंत सादर करण्यात यावे. त्यानंतर सादर करण्यात आलेल्या दरपत्रकाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच सदरची दरपत्रके त्याच दिवशी शक्यतो दुपारी ४ वाजता समितीतील सदस्यांच्या उपस्थितीत उघडण्यात येतील.

## दरपत्रक सादर करताना मार्गदर्शक सूचना

१) दरपत्रकातील दरांची तुलना करताना एकूण दरांचा विचार करण्यात येईल.
२) दरपत्रके पुरवठादाराच्या लेटर हेडवरच सादर करावे. लेटर हेडवर आपल्या संस्थेचा शिक्का व सही असणे बंधनकारक आहे.
३) दरपत्रके उधडतेवेळी इच्छुक पुरवठादार उपस्थित राहू शकतात.
४) ई-मेल मार्गाने सादर केलेल्या दरपत्रकांचा स्वीकार केला जाणार नाही.
५) दरपत्रकामध्ये नमूद केलेले दर हे अटी व शर्तीसह असल्यास दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.
६) शासनास किंवा या कार्यालयास पुरवठा केला असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
७) दरपत्रकामध्ये खाडाखोड केल्याचे आढळल्यास सदर दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.
८) विहीत मुदतीत सादर न केलेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.
९) दरपत्रकामध्ये नमूद केलेले दर/ किंमत सर्व करासहित असावे.
१०) पुरवठादाराने फक्त एकच दरपत्रक सादर करावे.
११) दरपत्रकामध्ये सादर केलेले दर हे एका वर्षासाठी ग्राहय धरण्यात येतील. यामध्ये वाढ किंवा घट करता येणार नाही.
१२) दरपत्रके स्विकारणे अथवा पुर्णतः नाकरण्याचा पूर्ण अधिकार मुख्य वैद्यकीय अधिकारी, राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र पुणे यांनी राखुन ठेवले आहेत.

10/2/26

मुख्य वैद्यकीय अधिकारी
राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र पुणे

प्रत : - सदर प्रत कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्दीकरिता

Scanned with OKEN Scanner